शाळा प्रवेशासाठी बालकाचे
किमान वय निश्चित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण -९८१४/प्र.क्र.१६०/एस.डी.१**
मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २१ जानेवारी, २०१५

**वाचा -** १) शासन निर्णय क्र.पीआरई/२०१०/(२१५)/प्राशि-१, दि.११ जून, २०१०

**प्रस्तावना -**

शासनाने दि. ११ जून, २०१० च्या शासन निर्णयान्वये शाळा प्रवेशाबाबतची कार्यपध्दती निश्चित केलेली आहे. सदर शासन निर्णयात प्रवेशाबाबतच्या इतर तरतूदीसोबत शाळा प्रवेशासाठी बालकाचे वयाबाबतची तरतूद आहे. सदर तरतूदीनुसार विद्यार्थ्यांच्या इ. १ ली मधील प्रवेशासाठीची वयोमर्यादा ६ वर्षे निश्चित केलेली आहे. तथापि, ५ वर्षे पूर्ण झालेले बालक इ. १ ली मधील प्रवेशासाठी पात्र राहतील, असे आदेशात नमूद केलेले आहे. राज्यात राज्य मंडळाचा अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळा, सी.बी.एस.ई, आय.सी.एस.ई, आय.बी. अशा विविध प्रकारच्या शाळा आहेत. सदर सर्व प्रकारच्या शाळांमध्ये प्रवेशाच्या वेळेस इ. १ ली साठी वेगवेगळी वयोमर्यादा वेगवेगळया दिनांकास ग्राहय धरुन प्रवेश दिले जातात. तसेच, पूर्व प्राथमिक वर्गातील प्रवेशासाठी निश्चित अशी वयाची अट सध्या अस्तित्वात नाही. सदर बाबी विचारात घेवून यामध्ये एकवाक्यता आणण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी शिक्षण संचालक (प्राथ) यांच्या अध्यक्षतेखाली एकसदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर समितीने दिलेल्या शिफारशीनुसार इ. १ ली तील व पूर्वप्राथमिक वर्गातील (प्ले ग्रुप / नर्सरी) प्रवेशासाठी बालकाचे किमान वय निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

सदर शासन निर्णयान्वये दि. ११ जून, २०१० च्या शासन निर्णयामधील "शाळा प्रवेशासाठी बालकाचे वय" याबाबत असणारी तरतूद वगळण्यात येत आहे.

**२.** पूर्व प्राथमिक व इ. १ ली मधील प्रवेशासाठीचे किमान वय खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रवेशाचा वर्ग | किमान वय | वयाबाबत मानिव दिनांक | अंमलबजावणी वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | प्ले ग्रुप / नर्सरी<br>(इ. १ ली पूर्वीचा ३ रा वर्ग) | ३+ | ३१ जुलै | २०१५-१६ |
| २ | इ. १ ली | ६+ | ३१ जुलै | २०१८-१९ |

३. वरील परिच्छेद २ मधील इ. १ ली मधील किमान वयाच्या निर्णयाची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात यावी.

| अ.क्र. | इ.१ ली साठी प्रवेशाचे किमान वय (दि. ३१ जुलै रोजीचे) | अंमलबजावणीचे शैक्षणिक वर्ष |
|---|---|---|
| १ | ५ वर्षे पूर्ण | २०१५-१६ |
| २ | ५ वर्षे व ४ महिने पूर्ण | २०१६-१७ |
| ३ | ५ वर्षे व ८ महिने पूर्ण | २०१७-१८ |
| ४ | ६ वर्षे पूर्ण | २०१८-१९ |

४. सदर आदेश राज्यातील सर्व प्रकारच्या, सर्व व्यवस्थापनाच्या शाळांना लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०११९१७०४२०८३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( गोविंद कांबळे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
६. मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
७. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
८. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
९. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. शिक्षण संचालक (प्राथ.), महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. सर्व विभागीय उपसंचालक
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
१३. सर्व आयुक्त, महानगरपालिका
१४. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद
१५. निवड नस्ती (एस.डी.१)

शाळा प्रवेशासाठी बालकाचे किमान
वय निश्चित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन शुध्दीपत्रक क्रमांकः संकीर्ण -९८१४/प्र.क्र.१६०/एस.डी.१**

मादाम कामा मार्ग हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २३ जानेवारी, २०१५

वाचा -

१) शासन निर्णय क्र.पीआरई/२०१०/ (२१५)/प्राशि-१, दि.११ जून, २०१०

२) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-९८१४/प्र.क्र.१६०/एस.डी.१, दि. २१/०१/२०१५

**शासन शुध्दीपत्रक -**

उपरोक्त संदर्भाधिन दि. २१/०१/२०१५ च्या शासन निर्णयान्वये शाळा प्रवेशासाठी बालकाचे किमान वय निश्चित करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक २ मधील तक्त्यातील अंमलबजावणीचे वर्ष या रकान्यातील अनुक्रमांक १ संदर्भात **सन २०१५-१६ ऐवजी "सन २०१६-१७"** आणि अनुक्रमांक २ संदर्भात **सन २०१८-१९ ऐवजी "सन २०१९-२०"** असे वाचण्यात यावे. तसेच, सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ३ मधील तक्त्यातील अंमलबजावणीचे वर्ष या रकान्यातील अनुक्रमांक १ संदर्भात **सन २०१५-१६ ऐवजी "सन २०१६-१७" आणि त्यानुसार अनुक्रमांक २ बाबत "सन २०१७-१८", अनुक्रमांक ३ बाबत "सन २०१८-१९" अनुक्रमांक ४ बाबत "सन २०१९-२०"** असे वाचण्यात यावे.

सदर शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१५०१२३१७०९३५६४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(गोविंद कांबळे)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई

२. मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
६. मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
७. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
८. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
९. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. शिक्षण संचालक (प्राथ.), महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. सर्व विभागीय उपसंचालक
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
१३. सर्व आयुक्त, महानगरपालिका
१४. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद
१५. निवड नस्ती (एस.डी.१)